# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. २८-३२

( विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीतील बैठका )

**दिनांक : २७ फेब्रुवारी ते २५ मार्च २०२३**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| २८ | २ मार्च | विधानभवन, मुंबई | १० |
| २९ | ८ मार्च | विधानभवन, मुंबई | ३ |
| ३० | ९ मार्च | विधानभवन, मुंबई | ० |
| ३१ | १७ मार्च | विधानभवन, मुंबई | ७ |
| ३२ | २३ मार्च | विधानभवन, मुंबई | ११ |
| | | एकूण | ३१ |

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. २ मार्च २०२३
# ( एकूण निर्णय-१०)

विधि व न्याय विभाग

## महिला आणि बालकांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्थापन जलदगती न्यायालयातील पदे भरण्यास मान्यता

महिला व बालकांवरील अत्याचाराची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष जलदगती न्यायालयासाठी आवश्यक नियमित आणि बाह्ययंत्रणेमार्फत पदे भरावयाच्या प्रक्रियेस आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात राष्ट्रीय महिला सुरक्षा मिशन अंतर्गत महिलांवरील अत्याचार आणि पोस्को कायद्यांतर्गत अत्याचाराची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. या न्यायालयाच्या कामांना वेग देऊन अत्याचारग्रस्त महिला आणि बालकांना न्याय मिळवून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्यामुळे या न्यायालयातील ४१४ नियमित पदे आणि बाह्ययंत्रणेकडून सेवा घेण्यात येणारी ६९० पदांना मंजुरी देण्यात आली. त्याचबरोबर या पदांसाठीच्या राज्य शासनाच्या हिश्याच्या ६४ कोटी २१ लाख बावीस हजार २६५ इतक्या खर्चास देखील या बैठकीत मंजूरी देण्यात आली.

-----o-----

विधि व न्याय विभाग

## भिवंडी येथे जिल्हा व अतिरीक्त सत्र न्यायालय, वरीष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करणार

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे जिल्हा व अतिरीक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर ही दोन न्यायालये स्थापन करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

भिवंडी व ठाणे येथील प्रलंबित प्रकरणे जलदगतीने चालवण्यासाठी आणि न्यायदान प्रक्रिया अधिक लोकाभिमुख करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. या न्यायालयांसाठी आवश्यक पदांच्या निर्मितीस देखील यावेळी मान्यता देण्यात आली.

-----o-----

विधि व न्याय विभाग

## पंढरपुर मंदिरे अधिनियमात सुधारणेस मान्यता

पंढरपुर मंदिरे अधिनियम १९७३ मध्ये सल्लागार परिषदेचा कालावधी निश्चित करण्यासाठी अधिनियमात सुधारणेस आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या सुधारणेमुळे सल्लागर परिषदेचा कालावधी निश्चित होऊन या परिषदेच्या कालावधीबाबत कायदेशीर बाबी उपस्थित होणार नाहीत.

-----०-----

सार्वजनिक आरोग्य विभाग

## सीमा भागातील ८६५ गावातील नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू

महाराष्ट्र- कर्नाटक सीमा भागातील ८६५ मराठी भाषिक गावांतील नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील बेळगाव, कारवार, कलबुर्गी व बिदर जिल्ह्यातील १२ तालुक्यातील ८६५ गावातील अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य गटातील कुटुंबे आणि अन्नपुर्णा शिधापत्रिकाधारक कुटुंबांचा यात समावेश असणार आहे. लाभार्थी कुटुंबांना राज्यातील कोणत्याही खाजगी, अंगीकृत रुग्णालयामधून तसेच बेळगाव येथील के.एल.इ.हॉस्पिटल व पणजी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात योजनेचा लाभ घेता येणार आहे.

या भागातील रुग्णांना प्रभावीपणे सेवा देता यावी, याकरिता राज्यात सध्या अंगीकृत असणाऱ्या १ हजार रुग्णालयांव्यतिरीक्त कर्नाटकला लागून असलेल्या राज्यातील ८ जिल्ह्यांमध्ये अतिरीक्त १५० रुग्णालये अंगीकृत करण्यात येणार आहेत. यासाठी एकूण ५४ कोटींच्या अतिरीक्त खर्चास देखील या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

नगर विकास विभाग

## पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील अवैध बांधकामांना शास्ती कर माफ

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील अवैध बांधकामांना अटी व शर्तींच्या अधीन राहुन शास्ती कर माफ करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील मूळ मालमत्ता कराचा भरणा होऊन स्थायी उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार अवैध मालमत्ता धारकांनी मूळ कराचा संपूर्ण भरल्यावरच शास्ती माफ होणार आहे. ही माफी शासन निर्णय निघण्याच्या दिनांकापर्यंतच्या अवैध बांधकामांना लागू राहणार आहे. कलम २६७ (अ) नुसारची अवैध बांधकाम शास्ती माफ झाली म्हणजे सदर बांधकाम नियमित झाले असे समजण्यात येणार नाही. अशा विविध अटींचा समावेश या निर्णयात करण्यात आला आहे.

-----०-----

पदुम विभाग

## गोड्या पाण्यातील तलाव, जलाशयांची तलाव ठेका रक्कम माफ करण्याचा निर्णय

राज्यातील गोड्या पाण्यातील तलाव, जलाशयांची २०२१-२२ या वर्षाची तलाव ठेका रक्कम माफ किंवा समायोजित करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

कोरोना संसर्गाच्या अनुषंगाने घोषित टाळेबंदीमुळे मत्स्य व्यावसायिकांचे नुकसान झाले होते. या व्यावसायिकांना दिलासा देण्यासाठी राज्यातील दि.३० जून २०१७ आणि दि.३ जुलै २०१९ च्या शासन निर्णयाप्रमाणे ३३ मच्छिमार सहकारी संस्था आणि २ खाजगी ठेकेदार यांना तलाव ठेका रक्कम माफ करण्यात आली आहे.

-----०-----

जलसंपदा विभाग

## सिंधुदुर्गातील ओटाव लघु पाटबंधारे प्रकल्पास ९९.४९ कोटींची चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या कणकवली तालुक्यातील ओटाव लघु पाटबंधारे प्रकल्पास ९९.४९ कोटी रुपयांची चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

हा प्रकल्प ओटाव गावातील स्थानिक नाल्यावर प्रस्तावित असून या प्रकल्पामुळे ओटावसह नांदगांव या गावातील ५१८ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

-----o-----

पदुम विभाग

## राज्यातील बांधकाम प्रकल्पामुळे बाधित मच्छिमारांसाठी राज्यस्तरीय नुकसान भरपाई धोरण लागू

राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने धोरण निश्चित केले असून या धोरणास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यामध्ये मच्छिमारांच्या नुकसानीसाठी सहा श्रेणी ठरवण्यात आल्या असून त्यानुसार मच्छीमारांना २५ हजार ते ६ लाखांपर्यंत नुकसान भरपाई मिळणार असून भरपाई देताना कुटूंब हा एक घटक विचारत घेऊन एकरकमी व एकदा देण्यात येईल.

मच्छीमारांना देण्यात येणारी नुकसान भरपाई रकमेच्या ६ श्रेणी निश्चित करण्यात आल्या असून त्यापुढील प्रमाणे मासेमारी क्षेत्र कायमचे नष्ट झाले असल्यास ६ लाख रुपये, प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रापासून ५०० मीटर त्रिज्येतील क्षेत्रामधील मासेमारीवर परिणाम झाल्यास-४ लाख रुपये, हाताने मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांचे झालेले नुकसान २ लाख रुपये, दैनंदिन मासेमारीस निर्माण होणारी अडचण, मासेमारी क्षेत्रापर्यंत पोचण्यास येणारा वाढीव खर्च इ.- १ लाख रुपये, प्रकल्प बांधकामावेळी पाण्यामध्ये आलेली गढूळता यामुळे मासेमारीवर झालेला तात्पुरता प्रभाव ५० हजार रुपये तसेच बार्जेसमुळे मासेमारी नौका व जाळे यांचे नुकसान २५ हजार रुपये मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे.

या धोरणातील मुख्य बाबी पुढीलप्रमाणे:

प्रकल्पबाधित मच्छिमारांची ओळख, मासेमारी नौकेचा प्रकार आणि इतर माहिती तांत्रिक मुल्यमापन, सामाजिक प्रभाव मुल्यांकन अमंलबजावणी संस्था, यंत्रणाद्वारे बेस लाईन सर्वेक्षण आदर्श कार्यप्रणाली, मच्छिमारांना देण्यात येणारे नुकसान भरपाई, तक्रार निवारण यंत्रणा या बाबींचा धोरणात समावेश करण्यात आला आहे.

-----o-----

वित्त विभाग

## आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळाबरोबर सामंजस्य करारास मान्यता

आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळाबरोबर सामंजस्य करार करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याकरिता शुल्काधारीत सेवा देण्याच्या दृष्टीने हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराच्या अंमलबजावणीबाबत नियतकालीक संनियंत्रण व आढावा घेण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण व आढावा समिती स्थापन करण्यास देखील यावेळी मान्यता देण्यात आली.

-----०-----

गृहनिर्माण विभाग

## सशुल्क पुनर्वसन सदनिकांचे शुल्क निश्चित करण्यास मान्यता

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पुनर्वसन योजनेतील २००० ते २०११ पर्यंतच्या सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीधारकांच्या सशुल्क पुनर्वसन सदनिकेची किंमत २.५० लाख निश्चित करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या पुनर्वसन सदनिका/ गाळ्यांचा ताबा मिळाल्याच्या दिनांकापासूनच ७ वर्षाच्या कालावधीनंतर विकण्यास परवानगी देण्यात आली आहे. यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियम १९७१ मध्ये आवश्यक सुधारणा देखील बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. ८ मार्च २०२३
# ( एकूण निर्णय-३ )

महिला व बाल विकास विभाग

## राज्यात केंद्र पुरस्कृत “शक्ती सदन” योजना राबविण्यास मान्यता

केंद्र पुरस्कृत उज्वला व स्वाधार योजना विलीन करुन “शक्ती सदन” योजना राज्यामध्ये राबविण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधीचे प्रमाण केंद्र शासनाचा ६० टक्के हिस्सा आणि राज्य शासनाचा हिस्सा ४० टक्के या प्रमाणानुसार असणार आहे. योजनेसाठी राज्य हिश्यापोटी १० कोटी ९४ लाख ४० हजार इतक्या वार्षिक दायित्वास यावेळी मान्यता देण्यात आली.

-----०-----

महिला व बाल विकास विभाग

## केंद्र पुरस्कृत “सखी निवास” ही घटक योजना राबविण्यास मान्यता

केंद्र पुरस्कृत “सखी निवास” ही घटक योजना राज्यामध्ये राबविण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात सध्या नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह ही योजना सुरु आहे, ही योजना यापुढे केंद्र शासनाच्या मिशन शक्ती योजनेंतर्गत सामर्थ्य उपयोजनेंतर्गत सखी निवास म्हणून राबविण्यात येणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाचा ६० टक्के हिस्सा आणि राज्य शासनाचा हिस्सा ४० टक्के या प्रमाणानुसार राज्य हिश्यापोटी ६ कोटी २९ लाख ४४ हजार इतक्या वार्षिक दायित्वास यावेळी मान्यता देण्यात आली.

-----०-----

नगर विकास विभाग

## मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनला भूखंड हस्तांतरणास मान्यता

मुंबई शहरातील बीबीआर-III मधील भूखंड मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.कडे विशेष बाब म्हणून हस्तांतरीत करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या जमिनीचा महसूल मुक्त आणि उक्त मिळकतीचे मुल्यांकनाची रक्कम राज्य शासनाचा हिस्सा म्हणून ग्राह्य धरण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

## मंत्रिमंडळ निर्णय
## दि. ९ मार्च २०२३
## (एकूण निर्णय- ०)

निरंक

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. १७ मार्च २०२३
# (एकूण निर्णय- ७)

नगर विकास विभाग

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना**
**अंमलबजावणीत सुधारणेस मान्यता**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना अंमलबजावणीत सुधारणा करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या निर्णयानुसार योजनेचे नाव गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना असे करण्यात आले आहे. तसेच राज्यातील अपघातग्रस्त शेतकरी व त्यांच्या कुटुंबातील १ सदस्य यांचे प्रस्ताव क्षेत्रिय पातळीवर निकाली काढून जिल्हाधिकारी स्तरावर तातडीची मदत देण्यात येणार आहे. यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येणार आहे. या समितीचा निर्णय मान्य नसल्यास शेतकरी किंवा त्याचे वारसदार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील असणाऱ्या अपिलीय समितीकडे अर्ज करु शकणार आहे. या योजनेचे सनियंत्रण राज्यस्तरीय कृषि विभागाच्या अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव किंवा सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समिती करणार आहे.

योजनेमध्ये रस्ता, रेल्वे अपघात, पाण्यात बुडुन मृत्यू, जंतूनाशके हाताळतांना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरुन पडून झालेला अपघात, सर्पदंश व विंचूदंश, नक्षलाईटकडून झालेल्या हत्या, जनावरांच्या खाल्यामुळे किंवा चावण्यामुळे जखमी किंवा मृत्यू , बाळांतपणातील मृत्यू, दंगल, किंवा अन्य कोणताही अपघात या बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

या योजनेतंर्गत अपघाती मृत्यू, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय निकामी होणे, अपघातामुळे एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी होणे, अपघातामुळे एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी होणे या यासाठी दोन लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. तसेच अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास एक लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## कोल्हापूर येथे नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता

कोल्हापूर येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुरु करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्या कोल्हापूरमध्ये एका पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रासह एकूण ५ औद्योगिक क्षेत्र आहेत. तसेच भविष्यात कोल्हापूर बंगलोर कॉरिडॉर, आयटी हब आणि उत्पादन सुविधा सारखे प्रकल्प उद्योगांना आकर्षित करत आहेत. वाढत्या औद्योगिकरणासाठी मनुष्यबळाची आवश्यकताही वाढणार आहे. यासाठी हे महाविद्यालय महत्वाचे ठरणार आहे. या महाविद्यालयासाठी आवश्यक पदनिर्मिती आणि खर्चास देखील या बैठकीत मंजूरी देण्यात आली.

-----o-----

सार्वजनिक आरोग्य विभाग

## अंगणवाडी स्वंयसेविका आणि गटप्रवर्तकांच्या मोबदल्यात वाढ

राज्यातील आशा स्वंयसेविका आणि गटप्रवर्तक यांना राज्य शासनाच्या निधीतून देण्यात येणाऱ्या मोबदल्यात १५०० रुपये वाढ करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात सध्या ग्रामीण आणि नागरी भागात जवळपास ७० हजार आशा स्वंयसेविका आणि साडेतीन हजार गटप्रवर्तक कार्यरत आहेत. सध्या आशाा स्वंयसेविकांना ३५०० रुपये इतका आणि गटप्रवर्तकांना ४७०० रुपये इतका मोबदला देण्यात येतो. या निर्णयामुळे दोन्हींच्या मोबदल्यात १५०० रुपयांची वाढ होणार आहे. ही वाढ १ एप्रिल २०२३ पासून दिल्या जाणाऱ्या मोबदल्यात दिली जाणार आहे. या बैठकीत यासाठी आवश्यक खर्चास मंजूरी देण्यात आली.

-----o-----

महसूल विभाग

## राज्यातील कोतवालांच्या मानधनात वाढ

राज्यातील महसूल विभागांतर्गत कार्यरत सर्व कोतवालांना सरसकट १५ हजार रुपये मानधन देण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात सध्या कोतवालांना सेवा कालावधीनुसार ७ हजार ५०० ते १५ हजार असे दरमहा मानधन देण्यात येते. परंतू आजच्या निर्णयानुसार सर्व कोतवालांना सरसकट १५ हजार मानधन देण्यात येणार आहे. या निर्णयाचा फायदा राज्यातील १२ हजार ७९३ कोतवालांना होणार असून ही वाढ १ एप्रिल २०२३ पासून लागू होणार आहे.

-----o-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था अधिनियम २०१५ मध्ये सुधारणेस मान्यता

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मध्ये सुधारणा करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था अधिनियम २०१५ नुसार कलम ११ नुसार राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांच्या शुल्काचे विनियमन करण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरण स्थापित करण्यात आले आहे. या प्राधिकरणाच्या कार्यप्रणालीमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी या सुधारणा करण्यात येत आहे. त्यानुसार उच्च शिक्षण संचालक, तंत्रशिक्षण संचालक आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचा सदस्य यांना पदसिद्ध सदस्य याऐवजी निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करता येणार आहे. आयुषचे संचालक व राज्यातील कोणत्याही विद्यापीठाचे कुलसचिव यांना निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करता येणार आहे. प्राधिकरणात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना आमंत्रित करता येणार आहे. दहा वर्षापेक्षा कमी अनुभव नसलेल्या २ सनदी लेखापाल आणि २ परिव्यय लेखापाल यांची विद्यमान सदस्याव्यतिरीक्त नियुक्ती या निर्णयानंतर करता येणार आहे. तसेच शुल्क नियामक प्राधिकरणाच्या सचिव ऐवजी सदस्य सचिव अशा सुधारणा करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----o-----

वित्त विभाग

## कर्मचाऱ्यांना सेवा उपदान आणि कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान देण्यास मान्यता

परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना तसेच राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता सेवानिवृत्तिवेतन आणि सेवा उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान देण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या निर्णयानुसार राज्यात १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ च्या तरतूदी व मर्यादेनुसार १ नोव्हेंबर २००५ पासून हा लाभ लागू होणार आहे. या निर्णयामुळे सध्या सुरु असलेली सानुग्रह अनुदान योजना तात्काळ प्रभावाने बंद करण्यात येणार आहे.

१ नोव्हेंबर २००५ ते आजपर्यंतच्या कालावधीत मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबास मृत्यू उपदानाची व कुटुंबनिवृत्तिवेतनाच्या थकबाकीची रक्कम यापूर्वी त्यांच्या कायदेशीर वारसास देण्यात आलेले सानुग्रह अनुदान तसेच शासनाचे अंशदान (लाभांशासह) या रकमांशी समायोजित करण्याच्या अटीवर कुटुंबांतील पात्र व्यक्तीकडून विकल्प घेण्यात येणार आहे.

राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना आपला विकल्प निवडावा लागणार आहे. जिल्हा परिषद, मान्यता प्राप्त व अनुदानित शासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, कृषित्तर विद्यापिठे त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित महाविद्यालये तसेच कृषी विद्यापिठे व त्यासारख्या अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांनाही ही योजना लागू होणार आहे.

-----०-----

पणन विभाग

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय

कांद्याच्या दरात झालेल्या घसरणीबाबत उपाययोजना करुन कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रति क्विंटल ३०० रुपये अनुदान देण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात १ फेब्रुवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीमध्ये ज्या शेतकऱ्यांनी लेट खरीप हंगामातील लाल कांदा संबंधित तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती, खाजगी बाजार समितीमध्ये, थेट पणन परवानाधारकाकडे अथवा नाफेडकडे विक्री केला आहे. अशा शेतकऱ्यांना ३०० रुपये प्रति क्विंटल प्रमाणे २०० क्विंटल प्रति शेतकरी मर्यादेत याप्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे. ही योजना १ फेब्रुवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीसाठीच राबविण्यात येणार आहे.

-----०-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. २३ मार्च २०२३
# ( एकूण निर्णय– ११ )

महिला व बाल विभाग

**अनाथ आरक्षण धोरणात बदलास मान्यता**

अनाथ आरक्षण धोरणात बदलास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

अनाथांचे अ आणि ब प्रवर्ग एकत्र करुन संस्थात्मक आणि क प्रवर्गाचा संस्थाबाह्य असे दोन प्रवर्ग करुन दोन्ही प्रवर्गातील अनाथांना शिक्षण व नोकरी मध्ये दि.३१ ऑक्टोबर २०२२ नंतर होणाऱ्या नवीन परीक्षांना १ टक्का आरक्षण लागू करण्यात येणार आहे. दोन्ही प्रवर्गातील अनाथांना समान न्याय मिळावा म्हणून शासकीय पदभरतीमध्ये अनाथ आरक्षणातून उपलब्ध होणाऱ्या पदांची या दोन प्रवर्गामध्ये समान पद्धतीने वाटणी करण्यात येणार आहे. जेव्हा पदभरतीमध्ये विषम पदे उपलब्ध होतील तेव्हा समसमान वाटणी झाल्यावर उरणारे अधिकचे एक पद दोन्ही प्रवर्गासाठी भरती प्रक्रियेमध्ये आळीपाळीने आरक्षित करण्यात येणार आहे.

-----०-----

विधि व न्याय विभाग

**राज्यातील दुय्यम न्यायालयातील**
**न्यायिक अधिकाऱ्यांना ३ आगाऊ वेतनवाढ लागू**

विधि शाखेचे पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या राज्यातील दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना ३ आगाऊ वेतनवाढ लागू करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या वेतनवाढी दि.१ नोव्हेंबर १९९९ पासून लागू होणार आहेत.

-----०-----

पदुम विभाग

## राज्यात गोसेवा आयोगाची होणार स्थापना

राज्यात महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यातील गोवंशीय पशुधनाच्या सांभाळ आणि संगोपनासाठी या आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. या आयोगासाठी आवश्यक असलेली पदे निर्माण करण्यास आणि आयोगाच्या खर्चासाठी निधीची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

-----०-----

सामान्य प्रशासन विभाग

## महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियमास (मेस्मा) ५ वर्षांची मुदतवाढ

महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियमास (मेस्मा) २८ फेब्रुवारी २०२३ पासून पुढील ५ वर्षांसाठी मुदतवाढ देण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी संपावर गेल्यास संप काळात योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी हा अधिनियम आवश्यक आहे. या अधिनियमानुसार आकारण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम २ हजारावरुन ३ हजार रुपये इतकी करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

सहकार विभाग

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये दुरुस्तीस मान्यता

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३अअअ व कलम ७८ अ मध्ये दुरुस्ती करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन जाहिर झाले होते. अशा परिस्थितीत सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणे शक्य नसल्याने त्या पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सहकारी संस्थांचे तत्कालिन विद्यमान सदस्यांना नियमितपणे पदावर ठेवण्यासाठी अधिनियमात दुरुस्ती करण्यात आली होती. यानुसार अधिनियमातील कलम ७३अअअ व कलम ७८ अ मध्ये परंतूक समाविष्ट करण्यात आले होते. आता कोविड महामारीचा प्रादुर्भाव ओसरल्याने ही परंतूक काढुन टाकण्यासाठी बैठकीत निर्णय घेण्यात आला.

-----०-----

सामाजिक न्याय विभाग

## राज्यात शिक्षण, नोकरीसह सर्व शासकीय योजनांमध्ये तृतीयपंथीयासाठी लिंग पर्याय उपलब्ध करुन देणार

राज्यातील तृतीयपंथी या घटकास शिक्षण व नोकरी या क्षेत्रासह सर्व शासकीय योजनांमध्ये लिंग पर्यायामध्ये स्त्री, पुरुष या पर्यायासोबत तृतीयपंथी हा पर्याय उपलब्ध करुन देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यातील तृतीयपंथी समाज घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आणि त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाने एक पाऊल पुढे टाकले आहे. तृतीयपंथीयांसोबतचा भेदभाव टाळण्यासाठी सर्व शासकीय विभाग आणि सार्वजनिक प्राधिकरणांच्या पदांच्या भरती प्रक्रियेच्या अर्जांवर लिंग पर्याय म्हणून पुरुष आणि स्त्री या पर्यायासोबत तृतीयपंथी हा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

जिथे जिथे लिंगाबाबत विचारणा करण्यात येईल तिथे तिथे तृतीयपंथी हा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मात्र नोकरी, शिक्षण किंवा विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी संबधित सक्षम प्राधिकारी आवश्यक पात्रता ठरवतील. त्या पात्रतेची पुर्तता तृतीयपंथीयांना करावी लागेल.

-----o-----

उद्योग विभाग

## राज्यात स्वतंत्र खनिकर्म उपविभाग निर्माण करण्यास मान्यता

राज्यात स्वतंत्र खनिकर्म उपविभाग निर्माण करुन विभागाचे नाव उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात सध्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामार्फत खनिकर्म विभागाचे कामकाज पाहिले जाते. राज्यात खनिज उत्पादनात वाढ होत असून त्यापासून मिळणाऱ्या महसूलात देखील वाढ होत आहे. राज्यातील खनिज संपत्तीचा शोध, प्रक्रिया उद्योग, खनिज पट्ट्यांचे वाटप तसेच खनिज संपत्ती विकासाच्या योजना राबविल्या जात आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सध्या उद्योग विभागांतर्गत कार्यरत कार्यासने वेगळी करुन खनिकर्म उपविभाग निर्माण करण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ या उपक्रमाचा समावेशही या उपविभागात करण्यात येत आहे. या बदलानंतर विभागाच्या नावातही खनिकर्मचा उल्लेख करुन आवश्यक बदल करण्यास आणि विभागासाठी पदनिर्मितीस या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----o-----

सार्वजनिक आरोग्य विभाग

## ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाची १४.८३ एकर जागा ठाणे महापालिकेस उपलब्ध करुन देण्यास मान्यता

ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाची १४.८३ एकर जागा ठाणे महापालिकेस उपलब्ध करुन देण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

ठाणे व मुलुंड स्थानकांच्या दरम्यान प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जागेवर नविन (विस्तारीत) रेल्वे स्थानक प्रस्तावित आहे. या अनुषंगाने ठाणे महापालिकेस ही जागा हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचे निमहान्स, बंगळुरुच्या धर्तीवर पुननिर्माण करण्यासाठी ६७५.८३ इतकी तरतूद कालबद्ध कार्यक्रमानुसार उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच मनोरुग्णालयातील ८ एकर क्षेत्रावरील अनधिकृत बांधकाम ठाणे महापालिका आणि ठाणे जिल्हाधिकारी यांनी काढण्यासह इतर विषयांना मान्यता देण्यात आली.

-----०-----

सामान्य प्रशासन विभाग

## मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी कार्यक्रम आराखड्यास मान्यता

मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी मराठवाडा विभागामध्ये १७ सष्टेंबर २०२२ ते १७ सप्टेंबर २०२३ या कालावधीत आयोजित विविध कार्यक्रमांच्या प्रस्तावित आराखड्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यानिमित्त पूर्ण वर्षभर मराठवाडा विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद आणि बीड या आठ जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचा आराखडा मंत्रिमंडळ उपसमितीने प्रस्तावित केला आहे. उपसमितीने जिल्हानिहाय प्रस्तावित केलेल्या एकूण ७५.१२ कोटी रुपयांच्या प्रस्तावित कामांना मान्यता देण्यात आली.

-----०-----

उद्योग विभाग

## महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणुक सुविधा कक्ष कायद्यात सुधारणा करण्यास मान्यता

राज्याच्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणुक सुविधा कक्ष अर्थात मैत्री कायद्यातील सुधारणेस आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

उद्योगांना आवश्यक परवानग्या सुलभतेने मिळण्यासाठी उद्योग विभागाने मैत्री कायदा अंमलात आणला आहे. या कायद्याअंतर्गतच्या एक खिडकी योजनेला वैधानिक दर्जा मिळवून देण्यासाठी मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली सुधारणा महत्वाची ठरणार आहे.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ अधिनियम १९९७ मधील विविध कलमांमधील सुधारणांना मान्यता

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ अधिनियम १९९७ मधील विविध कलमांमध्ये सुधारणा करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

अधिनियमातील कलम २,४,५,६,२०,२२,२३,२४,२५,२६,२७,३२,३३,३४,३५,३७,३८,४६ आणि ४७ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. यात महाराष्ट्राबाहेरील संस्थांना संलग्नता देण्यासह विविध नियमांमध्ये बदल करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----